# <u>वैध मापन शास्त्र यंत्रणा ( वजने व मापे )</u>
# <u>नागरीकाची सनद</u>
# <u>यंत्रणे मार्फत देण्यात येणा-या सेवा</u>

वैध मापन शास्त्र यंत्रणे मार्फत कायदा व त्याखालील नियम यांची अंमलबजावणी करुन ग्राहकांच्या हितांचे रक्षण केले जाते. यामध्ये प्रामुख्याने वजनात किंवा मापात माल / वस्तू कमी देणे, छापील किंमतीपेक्षा जास्तदराने आवेष्टित वस्तूंची विक्री करणे, छापील किंमतीत खाडाखोड करुन ग्राहकांची फसवणूक करणे इत्यादींबाबतीत कार्यवाही करुन ग्राहकांचे हित जपले जाते.

या सदंर्भातील अधिनियम व नियम पुढीलप्रमाणे आहेत.

१. वैध मापन शास्त्र अधिनियम २००९.
२. वैध मापन शास्त्र ( आवेष्टिम वस्तू ) नियम, २०११
३. वैध मापन शास्त्र ( सर्वसाधारण ) नियम, २०११
४. महाराष्ट्र वैध मापन शास्त्र ( अंमलबजावणी ) नियम, २०११.

वरील अधिनियम व त्याखालील नियमांची अंमलबजावणी करत असताना प्रामुख्याने खालील कार्ये या यंत्रणेमार्फत केली जातात.

**१. वजन वा मापांची पडताळणी व मुद्रांकन - वजन माप उपयोगकर्त्याकडील**

( अ ) वजने, क्षमता मापे लांबी मापे, टेप, दांडी तराजू आणि फलक यंत्र इत्यांदीची २४ महिन्यातून एकदा

( ब ) साठवणूक टाकी पाच वर्षातून एकदा, व

( क ) इतर सर्व वजने मापे १२ महिन्यातून एकदा पडताळणी व मुद्रांकन करुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे.

या पडताळणीसाठी उपयोगकर्त्याने आपली वजने, मापे संबंधित निरीक्षकाकडे सादर करावयाची असतात. ही वजने व मापे परवानाधारक दुरुस्तकामार्फतही सादर करता येऊ शकतात. ग्रामीण पातळीवर यासाठी निरीक्षक पूर्वनिर्धारीत कालावधीमध्ये शिबीराचे आयोजन करतात.

**२. वजन माप विषयक परवाने** -

उपरोक्त धिनियम / नियमातील तरतुदींनुसार विहीत परवाना असल्याखेरीज कोणासही वजन वा मापांचे उत्पादन, दुरुस्ती व विक्री करता येत नाही. यासाठी खालील परवान्यांची आवश्यकता असते.

**( अ ) उत्पादक परवाना देणे / नूतनीकरण -**

कोणतेही वजन वा माप, ज्यामध्ये तोलन वा मापन उपकरणांचाही समावेश होतो, यांचे उत्पादन करण्यासाठी उत्पादक परवाना घेणे आवश्यक आहे. सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. तसेच या परवान्याचे नूतनीकरणही याच कार्यालयाकडून करण्यात येते.

**( ब ) दुरुस्ती परावाना देणे -**

कोणतेही वजन वा माप यांची दुरुस्ती करण्यासाठी दुरुस्तक परवाना घेणे आवश्यक आहे. दुरुस्तीचे कार्यक्षेत्र एकापेक्ष जास्त प्रोदेशिक विभाग असल्यास सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. दुरुस्तीचे कार्यक्षेत्र फक्त प्रादेशिक विभाग असल्यास परावाना संबंधित प्रादेशिक विभागाचे उप नियंत्रक यांचेकडून देण्यात येतो.

**( क ) दुरुस्ती परवाना नूतनीकरण -**

नियंत्रक कार्यालयाने दिलेल्या फक्त दुरुस्ती परवान्याचे नूतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या प्रादेशिक विभागात आहे त्या प्रादेशिक विभागाचे उप नियंत्रक यांचेकडून केले जाते. प्रादेशिक विभाग उप नियंत्रक यांनी दिलेल्या परवान्याचे नूतनीकरण सदर परावानाधारकाची कार्यशाळा ज्या जिल्ह्यामध्ये आहे. त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक यांचेकडून केले जाते.

**( ड ) विक्री परवाना देणे / नूतनीकरण -**

कोणतेही वजन वा माप यांची विक्री करण्यासठी विक्री परावाना घेणे आवश्यक आहे. यासाठी अर्जदाराचे नोंदिणीकृत कार्यालय ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक यांचेकडून विक्री परावाना देण्यात येतो, तसेच या परवान्याचे नूतनीकरणही त्यांचेकडूनच करण्यात येते.

वरील सर्व परवान्यासाठी / परावाना नूतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने महाराष्ट्र वैध मापन शास्त्र ( अंमलबजावणी ) नियम, २०११ मध्ये विहीत करण्यात आलेले आहेत.

इच्छूक व्यक्तींनी परावाना मिळविण्यासाठी संबंधित अधिका-यांकडे अर्ज करावयाचा असतो. अर्जाच्या छाननी नंतर जर इच्छूक व्यक्ती परवाना मिळण्यास पात्र आढळली तर त्यास विहित शुल्काचा भरणा केल्यानंतर परवाना दिला जातो. वरील सर्व परवाने सुरुवातीस एक कॅलेंडर वर्षासाठी देण्यात येतात. परवान्यांचे नूतनीकरण करण्यासाठीचा अर्ज परवान्याची मुदत संपण्यापूर्वी ३० दिवस आगोदर करावा लागतो. अन्यथा त्यास नियंमीत शुल्कासह ५० टक्के अतिरिक्त शुल्क आकारुन नियंत्रकाच्या मान्यतेने परवान्याच्या विहित मुदतीत नूतनीकरण करण्यासाठी अर्ज करता येतो, तथापि एक महिन्याची वाढीव मुदत संपेपर्यंत परवानाधारकाने नूतनीकरणासाठी अर्ज केला नाही तर त्याचा परावाना रद्द होतो.

**( इ ) आवेष्टित वस्तू उत्पादक / आवेष्टक / आयातदार नोंदणी -**

आवेष्टित वस्तूंचे उत्पादन / आवेष्टन / आयात करणा-या सर्वांना याबाबतची नोंदणी करणे बंधनकारक आहे. यासाठी आयातदार, उत्पादक वा आवेष्टक प्रायव्हेट लिमिटेड व लिमिटेड संस्था, यांची नोंदणी नियंत्रणक कार्यालयात करण्यात येते व इतर सर्वांची नोंदणी नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक कार्यालयात करण्यात येते.

**(फ) आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांच्या संक्षिप्त पत्याची नोंदणी करणे -**

आवेष्टित वस्तू उत्पादक / आवेष्टक / आयातदार यांच्या संक्षिप्त पत्याची नोंदणी नियंत्रक कार्यालयात करण्यात येते.

**३. वजन वा माप आणि आवेष्टित वस्तू नियम विषयक तरतूदींचा भंग -**

खोट्या वजनमांपाचा वापर, वजनात कमी माल देणे, अधिक मालाची मागणी करणे, आवेष्टित वस्तुंची छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, त्यावरील मूळ किंमतीमध्ये खाडाखोड करणे, पाकिटावर घोषित निव्वळ वजन वा माप पेक्षा माल कमी आढळणे, आवेष्टित वस्तूवर आवश्यक उद्घोषणा न छापणे इत्यादी बाबींमध्ये ग्राहकांची व सर्वसाधारण जनतेची फसवणूक होत असल्याचे आढळून आल्यास वा वैध मापन शास्त्र विषयक तरतुदींचा भंग होत असल्यास निरीक्षक संबंधितांविरुध्द कारवाई करतात. ग्राहकास व सर्वसाधारण जनतेस या बाबी आढळून आल्यास अथवा याबाबतीत तक्रारी असल्यास तक्रार नोंदविण्यासाठी यंत्रणेने स्वतंत्र दुरध्वनी ( ०२२- २२८८६६६६ ) उपलब्ध करुन दिलेला आहे. याव्यतिरिक्त माहितीसाठी व तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र संकेत स्थळ : **legalmetrology.maharashtra.gov.in व**

**e-mail : dclmms@yahoo.in**

ग्राहकासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. जिल्हापातळीवर तक्रार नोंदविण्यासाठी जिल्हा सहायक नियंत्रक यांचे दूरध्वनी क्रमांक संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तक्रारी प्राप्त झाल्यावर संबंधित कार्यालयाकडून त्यांची त्वरीत दखल घेतली जाते व तरतूदींचा भंग झाला असल्यास आपराध्यांविरुध्द खटला नोंदविण्यात येतो. अधिनियमातील व नियमातील तरतुदींनुसार प्रशमन करता येत असलेले खटले संबंधिताने विनंती केल्यास तडजोडीने मिटविण्यासाठी आदेशित प्रशमन रक्कम शासन जमा करण्याच्या अटीस अधिन राहून प्रशमित करण्यात येतात किंवा सदर खटले न्यायालयात दाखल केले जातात. त्याचप्रमाणे याबाबत विनंतीनुसार तक्रारदारासही कळविण्यात येते.

**यंत्रणेमार्फत करण्यात येणारी कामे, जबाबदार अधिकारी, कार्यपूर्ती कालावधी कालावधी व याबाबत तक्रार निवारण अधिकारी इत्यादींचा तपशील**

| अ. क्र. | कार्यसूची | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी | कार्यपूर्तीचा कालावधी | विहित मुदतीत कार्यपूर्ती न झाल्यास कोणत्या अधिका-याकडे तक्रार करावी. |
|---|---|---|---|---|
| १ | वजन माप उत्पादक, दुरुस्तक, विक्रेते यांच्या गैरवर्तणूकी बाबतच्या तक्रारी. | उपनियंत्रक | १ महिना | नियंत्रक |
| २ | कार्यालयीन / शिबीर कार्यालयातील वजन मापांच्या पडताणीबाबत. | निरीक्षक | त्याच दिवशी व / किंवा लगतच्या कार्यालयीन दिवशी | सहायक नियंत्रक |
| ३ | वजन माप उत्पादकांना उत्पादन, विक्री व दुरुस्ती अर्जानुसार परवाना देणे, नूतणीकरण करणे तसेच महाराष्ट्र राज्य किंवा एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभागांसाठी दुरुस्ती परवाना देणे, (संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास ) | उपनियंत्रक मुख्यालय | ४५ दिवस | नियंत्रक |
| ४ | वजन माप दुरुस्तक यांना प्रादेशिक विभागासाठी अर्जानुसार परवाना देणे (संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास) | प्रादेशिक उपनियंत्रक | ४५ दिवस | नियंत्रक |
| ५ | संबंधित जिल्ह्यात नोंदणीकृत आस्थापना / कार्यशाळा असणारे वजन माप विक्रेते यांना अर्जानुसार परावाना देणे नूतणीकरण करणे व संबंधित जिल्ह्यात नोंदणीकृत आस्थापना / कार्यशाळा असणारे व उपनियंत्रक यांनी दिलेले वजन माप दुरुस्तक परवाने यांचे नूतनीकरण करणे. ( संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास ) | जिल्हा सहायक नियंत्रक | ४५ दिवस | प्रादेशिक उपनियंत्रक |
| ६ | आवेष्टित वस्तू उत्पादक / आवेष्टक/ आयातदार यांची नोंदणी | उपनियंत्रक मुख्यालय / जिल्हा सहायक नियंत्रक | ७ दिवस | नियंत्रक / विभागीय उपनियंत्रक |
| ७ | वजना माप विषयक तरतुदीच्या भंगाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी | निरीक्षक | ७ दिवस | सहायक नियंत्रक |
| ८ | कनिष्ठ कार्यालयाचे आदेश / निर्णय विरुध्दच्या अपीलाबाबतची संपूर्ण कार्यवाही | नियंत्रक | १ महिना | शासन |

( ह. तु. बोकडे )
सहाय्यक नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
भंडारा - गोंदिया जिल्हे